# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

जा.क्र. झोपुप्रा/सहनि/कार्यासन-१/टी.सी.१/२९०६/सन २०१८
सहकार कक्ष, झो.पु.प्रा., मुंबई
दिनांक : २५.०४.२०१८

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
. . . . . . . . . . . एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,

**विषय : मा. राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडिल रामाआ-अपिल क्र. बीएम-४९९८/२०१७ वर दिनांक १९.१२.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयानुसार संस्थेच्या सचिवांना जन माहिती अधिकारी म्हणुन घोषित करणेबाबत.**

**संदर्भ : मा. सचिव, झोपुप्रा यांचेकडिल दिनांक २५.०४.२०१८ रोजीचे सुचना पत्र.**

उपरोक्त नमुदप्रमाणे अपिलार्थी श्री. जयप्रकाश शिवराम पागधरे विरुध्द जन माहिती अधिकारी यांचे संबंधित अपिल रामाआ-अपिल क्र. बीएम- ४९९८/२०१७ वर मा. राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी कलम १९ (३) अन्वये दिनांक १९.१२.२०१७ रोजी निर्णय दिलेला आहे. सदर निर्णयाचे अवलोकन करता त्यामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत स्थापित झालेल्या व यापुढे नोंदणीकृत होणाऱ्या सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांना माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (एच) अंतर्गत सार्वजनिक प्राधिकरण म्हणुन घोषित केलेले आहे. तसेच कलम १९ (८) अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., मुंबई यांना निर्देश देऊन त्यांनी पुनर्वसन योजनेतील सदनिकासाठीच्या नोंदणीकृत करण्यात आलेल्या सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये जन माहिती अधिकारी तात्काळ नामनिर्देशित करण्यात यावे असा निर्णय दिलेला आहे. सदर निर्णयाची प्रत प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर दिनांक १९.१२.२०१७ रोजीच्या निर्णयाच्या अनुषंगाने मा. सचिव, झोपुप्रा यांनी या कार्यालयास संदर्भाधिन दिनांक २५.०४.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सूचना देऊन पुनर्वसन योजनेतील सर्व नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी जन माहिती अधिकारी घोषित करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार संस्थेचे सचिव यांना जन माहिती अधिकारी म्हणुन घोषित करण्यात येत आहे. त्यानुसार सचिव तथा जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९.१२.२०१७ रोजीच्या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करुन कामकाज करण्यात यावे. सदरचे निर्णय / पत्राची प्रत सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात यावे तसेच संस्थेच्या नोटिस फलकावर प्रसिध्द करुन सर्व सभासदांना अवगत करण्यात यावे. याची जबाबदारी संस्था सचिव यांची राहिल याची नोंद घ्यावी.

त्याचप्रमाणे सदर दिनांक १९.१२.२०१७ रोजीच्या निर्णयाच्या अनुषंगाने प्राधिकरणांतर्गत सहकार कक्षातील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांना प्रथम अपिलीय अधिकारी म्हणुन घोषित करण्यात आलेले आहे. याबाबतची माहितीही संस्थेच्या सर्व सभासदांना देण्यात यावी.

सहनिबंधक,
सहकारी संस्था (पूर्व व पश्चिम उपनगरे),
झोपुप्रा., मुंबई

प्रशासकिय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पुर्व), मुंबई-४०००५१.
दुरध्वनी क्र. २६५६५८००/२६५९०४०५/१८७९, फॅक्स क्र. ९१-२२-२६५९०३१७, संकेतस्थळ : www.sra.gov.in, ई-मेल : info@sra.gov.in

Scanned by CamScanner